| MHJN040016902013 | दाखल दि. | - | २९.१०.२०१३ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दि. | - | २९.१०.२०१३ | | |
| | निकाल दि. | - | २०.०८.२०२६ | | |
| | कालावधी | - | वर्ष | महिने | दिवस |
| | | | १२ | ०९ | २२ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अंबड यांच्या न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : श्वेता एस. परीहार)**

**नि.फौ.ख. क्र.२२६/२०१३** **नि क्र.१४८**

महाराष्ट्र सरकार तर्फे
पोलीस ठाणे अधिकारी,
पोलीस ठाणे, गोंदी
ता. अंबड, जि. जालना. **......अभियोग पक्ष**

**-विरुध्द-**

**१. अ. गफुर शेख जाफर (मयत)**

**२. सलाम जाफर ताबोंळी,**
वय :५६ वर्षे, धंदा :

**३. चांद जाफर ताबोंळी,**
वय :५३ वर्षे, धंदा :

**४. जफर सलाम ताबोंळी,**
वय :३१ वर्षे, धंदा :

**५. जावेद सलाम ताबोंळी**
वय : २९ वर्षे, धंदा :

**६. यासर अ. गफुर ताबोंळी,**
वय :२३ वर्षे, धंदा :

**७. जुनेद चांद ताबोंळी,**
वय :२५ वर्षे, धंदा :

**८. शफीक अहेमद ताबोंळी,**
वय : ३३ वर्षे, धंदा :

**९. अ. मजीत अ. रशीद ताबोंळी (मयत)**

**१०. एजाज महेमुद ताबोंळी,**
वय :४२ वर्षे, धंदा :

**११. अखील अहेमद ताबोंळी,**
वय :३० वर्षे, धंदा :

**१२. जावेद मियाभाई शेख,**
वय : २५ वर्षे, धंदा :

**१३. नवीद चांद ताबोंळी,**
वय : २४ वर्षे, धंदा :

**१४. परवेज हमीद ताबोंळी,**
वय :२३ वर्षे, धंदा :

**१५. शेख करीम शेख मानिक ताबोंळी (मयत)**

**१६. नदीम हमीद तांबोळी,**
वय : २६ वर्षे, धंदा :

**१७. इसरार मुस्तफा ताबोंळी,**
वय : वर्षे, धंदा :

**१८. मुस्तफा जाफर ताबोंळी (मयत)**
सर्व रा. शहागड, ता. अंबड. जि. जालना **.....आरोपी**

<u>दोषारोप</u> - भारतीय दंड विधान कलम १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६, सहकलम १४९ प्रमाणे.

---

सरकार तर्फे -सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती. आर. एस. जाधव
आरोपीतर्फे -विधीज्ञ श्री. एन. आर. मापारी

---

**भाग — 'ब'**

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii)]

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | २७/०५/२०१३ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २८/०५/२०१३ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | २९/०९/२०१३ |

| | |
|---|---|
| दोषारोप निश्चित तारीख | ०४/०९/२०१७ |
| पुरावा सुरु झाला ती तारीख | ०२/०५/२०२६ |
| प्रकरण न्यायनिर्णय करीता ठेवले ती तारीख | २०/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २०/०८/२०२६ |
| शिक्षेची तारीख व इतर काही | -- |

## आरोपीचा तपशील

| अ.क्र | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोप मधील कलम | आरोपी निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ सी.आर.पी.सी. प्रमाणे शिक्षेमधुन सुट मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २. | सलाम जाफर ताबोंळी | ०४.०६.२०१३ | ०४.०६.२०१३ | भा.दं.वि कलम १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६ सह १४९ प्रमाणे. | आरोपींना निर्दोष सोडण्यात आले | - | - |
| ३. | चांद जाफर ताबोंळी | | | | | | |
| ४. | जफर सलाम ताबोंळी, | | | | | | |
| ५. | जावेद सलाम ताबोंळी | | | | | | |
| ६. | यासर अ. गफुर ताबोंळी, | | | | | | |
| ७. | जुनेद चांद ताबोंळी | | | | | | |
| ८. | शफीक अहेमद ताबोंळी | | | | | | |
| १०. | एजाज महेमुद ताबोंळी | | | | | | |
| ११. | अखील अहेमद ताबोंळी | | | | | | |
| १२. | जावेद मियाभाई शेख | | | | | | |
| १३. | नवीद चांद ताबोंळी | | | | | | |
| १४. | परवेज हमीद ताबोंळी | | | | | | |
| १६. | नदीम हमीद तांबोळी | | | | | | |
| १७. | इसरार मुस्तफा ताबोंळी | | | | | | |

## भाग — 'ब'

[फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii)]

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ) अभियोग पक्ष -**

| स्थान | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | लक्ष्मण धोत्रे | १३२ | पंच |
| सा.क्र.२ | इद्रीस रहीम शेख | १४० | साक्षीदार |
| सा.क्र.३ | शेख रहीम अहमद | १४१ | साक्षीदार |
| सा.क्र.४ | अशफाक रहीम शेख | १४२ | साक्षीदार |
| सा.क्र.५ | सय्यद अनवर सय्यद गफुर | १४३ | फिर्यादी |

**ब) बचाव पक्ष, असल्यास -**

| अ.क्र. | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| - | - | - | - |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास -**

| अ.क्र. | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| - | - | - | - |

## अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयीन कागदपत्रांची / निशाणी क्रमांक देण्यात आलेल्या दस्तांची यादी

**अ) अभियोग पक्ष -**

| अ.क्र. | निशाणी | दस्तऐवजांचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | १४७ | वैद्यकिय प्रमाणपत्र |
| २. | १४६ | घटनास्थळ पंचनामा |

**ब) बचाव पक्ष -**

| अ.क्र. | निशाणी | तपशील |
|---|---|---|
| - | - | - |

**क) न्यायालयीन दस्तऐवज -**

| अ.क्र. | निशाणी | तपशील |
|---|---|---|
| - | - | - |

**ड) भौतिक वस्तु -**

| अ.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | पी. आर. नं. ६४/२०१९ | दोन लोखंडी गज व एक तीन फुटाची काठी |

## न्यायनिर्णय

(दिनांक २०.०८.२०२६ रोजी घोषीत)

आरोपींविरुध्द प्रस्तुत खटला भारतीय दंड विधान १४७, १४८, ३२४, ५०४ व ५०६ सह १४९ अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढील प्रमाणेः-**

२. फिर्यादी सय्यद अनवर सय्यद गफुर यांनी अशी फिर्याद दिली की, दि. २७.०५.२०१३ रोजी ते त्यांच्या शेतात मोजणीचे काम चालू असल्याने हजर होते. तेव्हा तेथे अब्दुल गफुर व इतर आरोपींनी ट्रॅक्टर आणले व त्यांच्या शेतात येवून जबरदस्तीने ताबा करण्याचा प्रयत्न करू लागले. त्यांनी ट्रॅक्टर चालक रोखल्याने अब्दुल गफुर व त्यांच्यात बाचाबाची सुरू झाली तेव्हा आरोपी अब्दुल गफार व अब्दुल जाफर यांचे नातेवाईक इतर आरोपी तेथे हातात लोखंडी गज व काठ्या घेवून आले व इद्रीसच्या डोक्यात मारून जखमी केले व इतर आरोपींनी त्यांना व त्यांच्या सोबत असलेल्या लोकांना शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्या. सदरच्या भांडणाची सोडवा-सोडव रहीमशहा, शेख अनिस व अशपाकशहा व इतर लोकांनी केली.

३. सदर तक्रारीवरुन आरोपींविरुध्द गोंदी पोलीस ठाणे येथे गुन्हा क्रमांक ७४/२०१३ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास ए.एस.आय. एन. एम. शेख यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला, मुद्देमाल पावती फाडली,

साक्षीदारांचे जबाब नोंदविले, वैद्यकिय अहवाल हस्तगत केले व तपासाअंती आरोपींविरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

४. आरोपी न्यायालयासमोर हजर झाल्यानंतर माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुद्ध नि.क्र.१७ वर भारतीय दंड विधान १४७, १४८, ३२४, ५०४ व ५०६ सह १४९ अन्वये दोषारोप ठेवला. सदर दोषारोप आरोपींना समजावुन सांगण्यात आला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे नमुद करुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

५. आरोपींविरुद्ध दोषपुर्ण कथन पटलावर आले नसल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आलेले नाही.

६. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. एन. आर. मापारी यांचा युक्तीवाद ऐकला.

७. खालील मुद्दे परामर्श करण्याकरीता माझे समक्ष उपस्थित होतात व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि. २७.०५.२०१३ रोजी १७.०० ते १७.३० वाजेच्या सुमारास मौजे शहागड, ता. अंबड, जि. जालना येथे गट नं.४६ व गट नं.४७ मध्ये आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन समान उद्देशपुर्तेतेकरिता फिर्यादी व साक्षीदारांवर बलप्रयोग करून दंगा केला ? | **नाही.** |
| २. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशपुर्तेतेकरिता गैरकायद्याची मंडळी जमवुन समान फिर्यादी व साक्षीदारांवर हत्यारानिशी सज्ज होवून दंगा केला ? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ३. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या समान उद्देशपुर्ततेकरिता लोखंडी गजाने व काठीने फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली ? | **नाही.** |
| ४. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी आरोपींनी समान उद्देशपुर्ततेकरिता गैरकायद्याची मंडळी जमवून व साक्षीदार यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने त्यांचा अपमान करून त्यांना शिवीगाळ केली ? | **नाही.** |
| ५. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, वरील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी आरोपींनी समान उद्देशपुर्ततेकरिता गैरकायद्याची मंडळी जमवून व साक्षीदार यांना फौजदारी पात्र धाकधपटशा केला ? | **नाही.** |
| ६. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. ०१ ते ०५ करीता -**

८. सदर मुद्दे एकसारख्या पुराव्यावर आधारीत असल्यामुळे पुराव्याची पुनरावृती टाळण्याकरीता त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. आरोपीवरील आरोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने विनासंशय खालील बाबी सिद्ध करणे आवश्यक आहे.

a) आरोपींनी समान उद्देशपुर्ततेकरितागैरकायद्याची मंडळी जमवुन समान उद्देशपुर्ततेकरिता फिर्यादी व साक्षीदारांवर बलप्रयोग करून हत्यारानिशी सज्ज होवून दंगा केला लोखंडी गजाने व काठीने फिर्यादी व साक्षीदारांना मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली व त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने त्यांचा अपमान करून जिवे मारण्याची धमकी दिली.

९. अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.१ लक्ष्मण धोत्रे (पंच साक्षीदार) यांची साक्ष नोंदविली आहे. साक्षीदार क्र.१ ने त्याच्या पुराव्यादरम्यान दि.१९.०५.२०१३ रोजी पोलीसांना त्याला सह्या घेण्यासाठी पोलीस स्टशेनला बोलाविल्याचे कथन केले आहे. तसेच, त्याने हे सपष्टपणे नाकारले आहे की, पोलीसांनी त्यांच्यासमक्ष सोलापुर-औरंगाबाद महामार्ग २११ च्या पश्चिमेस शहागड शिवारातील गट नं.४७ मध्ये पंचनामा केला व त्यावेळी दुसरा पंच शेख सादेक शेख लालमिया हा हजर होता. सा.क्र.१ ने पंचनाम्यावरील केवळ त्याची सही मान्य केली असून मजकुर मान्य नसल्याचे कथन केले आहे. सा.क्र.१ च्या पुराव्यावरून असे दसून येते की, त्याने अभियोग पक्षाच्या कथनांना दुजोरा दिलेला नाही त्यामुळे घटनासथळ पंचनामा त्याच्यासमक्ष करण्यात आला याबाबत शंका निर्माण होते.

१०. अभियोग पक्षाने त्यांचे कथने सिध्द करण्यासाठी या प्रकरणातील जखमी साक्षीदार क्र.२ इद्रीस रहीम शेख, सा.क्र.३ शेख रहीम अहमद व साक्षीदार क्र.४ अशपाक रहीम शेख यांची साक्ष नोंदविली आहे. या सर्वांनी त्यांच्या साक्षीदरम्यान कथन केले आहे की, त्यांना घटनेबाबत काहीही माहित नाही व पोलीसांनी त्याचा जबाब नोंदविला नव्हते. त्याचबरोबर त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान ठामपणे कथन केले आहे की, आरोपींनी त्यांना मारहाण केली नव्हती व त्यांनी भांडण देखील सोडविले नव्हते. तसेच, साक्षीदार क्र.२ ते ४ यांनी असे स्पष्टपणे नाकारले आहे की, दि.२७.०५.२०१३ रोजी ते व फिर्यादी शेतामध्ये हजर असताना आरोपी तेथे आले व आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली व काठीने मारहाण केली. वरील नमूद साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, असे स्पष्ट होते की, त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनांना पुर्णपणे दुजोरा दिलेला नाही. याउलट त्यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान कबूल केले आहे की, त्यांचे व आरोपीचे न्यायालयाबाहेर मिटले आहे. तसेच, साक्षीदार क्र.२ इद्रीस ने त्याच्या उलटतपासादरम्यान कबूल केले आहे की, आरोपींनी त्याला मारहाण केली नव्हती व तो गाडीवरून पडल्याने त्याला मार लागला होता.

११. या प्रकरणातील मुख्य साक्षीदार क्रमांक ५ सय्यद अनवर सय्यद गफुर (फिर्यादी) याने त्याच्या पुराव्यादरम्यान असे कथन केले की, त्याचे आरोपींसोबत किरकोळ भांडण झाले होते त्यामुळे त्याने आरोपींविरूध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिल्याचे कथन केले आहे. तसेच, फिर्यादीतील मजकूर त्याला माहित नसल्याचे सांगीतले व पोलीसांनी त्याला फिर्याद वाचून दाखवली नसल्याचे कथन केले. फिर्यादी अभियोग पक्षास समर्थन करीत नसल्यामुळे अभियोग पक्षाने त्यांना उलटतपासणीच्या स्वरुपातील प्रश्ने विचारली. त्यामध्ये त्याने हे नाकबूल केले आहे की, दि.२७.०५.२०१३ रोजी त्यांच्या शेतामध्ये हजर असताना तेथे आरोपी गफुर तांबोळी हे व त्याचे इतर नाईवाईक आले व त्यांनी गज व काठीने फिर्यादी व इतर साक्षीदारांना मारहाण केली. तसेच, आरोपींनी त्यांना शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या होत्या व त्यावेळी रहीम व अनिज भाई अशपाक यांनी भांडण सोडविले होते हे देखील स्पष्टपणे फिर्यादीने नाकबूल केले आहे.

१२. आरोपींवरील गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने इतर साक्षीदार तपासणे गरजेचे होते. साक्षीदार क्र. १ ते ५ हे या प्रकरणातील महत्वाचे साक्षीदार आहेत. परंतू, त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनांना दूजोरा दिलेला नाही. त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनाला पूर्णपणे समर्थन केलेले नाही. याउलट, त्यांनी त्यांच्या पूराव्यादरम्यान त्यांचे व आरोपींमध्ये न्यायालयाबाहेर मिटले असल्याचे कथन केले आहे. बचाव पक्षाने वैद्यकिय प्रमाणपत्र व घटनास्थळ पंचनामा मान्य केली आहे. परंतु फिर्यादीला व इतर साक्षीदारांना लोखंडी गजाने व काठीने मारहाण केली हे आरोपींनी मान्य केलेले नाही. अभिलेखावर असा कोणताही पुरावा दाखल केलेला नाही की, ज्यावरुन असे सिध्द होईल की, सर्व आरोपींनी समान उद्देशपुर्ततेकरिता गैरकायद्याची मंडळी जमवून फिर्यादी व साक्षीदार यांना बलप्रयोग केला व हत्यारानिशी सज्ज होवून दंगा केला व लोखंडी गजाने व काठीने मारहण करून शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे आरोपींनी घटनास्थळ व वैद्यकिय अहवाल मान्य केला हे अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही. पटलावरुन असे

दिसून येते की, आरोपी व फिर्यादी त्यांच्यामध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे.

१३. एकंदरीत अभिलेखावरील उपलब्ध पुराव्यावरुन आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना बलप्रयोग केला व हत्यारानिशी सज्ज होवून दंगा केला व लोखंडी गजाने व काठीने मारहण करून शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली ही बाब सिध्द होत नाही. अभियोग पक्षाने असा कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही की, ज्यावरुन आरोपीविरुद्ध गुन्हा हा संशयापलीकडे सिद्ध केला जाईल. सबब, मी मुद्दा क्रमांक ०१ ते ०५ चे निष्कर्ष **नकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र.०६ करीता</u>** -

१४. मुद्दा क्रमांक ०१ ते ०५ च्या निष्कर्षावरुन अभियोग पक्ष आरोपीवरील आरोप सिद्ध करु शकला नसल्याने आरोपींची निर्दोष मुक्तता करणे न्यायसंगत वाटते. सबब, मी मुद्दा क्रमांक ०६ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी २. सलाम जाफर ताबोंळी, ३. चांद जाफर ताबोंळी, ४. जफर सलाम ताबोंळी, ५.जावेद सलाम ताबोंळी, ६. यासर अ. गफुर ताबोंळी, ७. जुनेद चांद ताबोंळी, ८. शफीक अहेमद ताबोंळी, १०.एजाज महेमुद ताबोंळी, ११. अखील अहेमद ताबोंळी, १२. जावेद मियाभाई शेख, १३. नवीद चांद ताबोंळी, १४. परवेज हमीद ताबोंळी, १६. नदीम हमीद तांबोळी, १७. इसरार मुस्तफा ताबोंळी यांची भारतीय दंड विधान १४७, १४८, ३२४, ५०४ व ५०६ सहकलम १४९ या कलमांखालील गुन्ह्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक मुचलके व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल दोन लोखंडी गज व एक काठी ही मुल्यहीन असल्यामुळे अपील कालवधीनंतर नष्ट करण्यात यावे.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहीता कलम ४३७-अ च्या पुर्ततेसाठी प्रत्येकी रक्कम रु. १०,०००/- चा जामिन बंधपत्र द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात आरोपीच्या उपस्थितीमध्ये दिनांक २०/०८/२०२६ रोजी घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHWETA SHIVPRASAD PARIHAR
Location: Ambad, Tq. Ambad, Dist. Jalna
Date: 2026.08.20 17:54:17 +0530

दि. २०.०८.२०२६.

**(श्वेता एस. परीहार)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय,
अंबड.

**प्रमाणपत्र**

| |
|---|
| प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ फाईल मधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्द न शब्द जशास तसा व बरोबर आहे. |

| | |
|---|---|
| **लघुलेखकाचे नांव** | के.एम.कुदर |
| **कार्यालयाचे नाव** | प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, अंबड. न्यायालय क्र.३. |
| **दिनांक** | २०/०८/२०२६ |
| **पी.डी.एफ दिनांक** | २०/०८/२०२६ |
| **अपलोड दिनांक** | २०/०८/२०२६ |

**स्वा/**
लघुलेखक